### राजगड राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन व विद्यापीठीय

*✻ वक्तृत्व स्पर्धा ✻*

## पारितोषिके

फिरता करंडक वैयक्तिक प्रथम क्रमांकासाठी

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक पारितोषिक | रु. ७००१/- |
| द्वितीय क्रमांक पारितोषिक | रु. ५००१/- |
| तृतीय क्रमांक पारितोषिक | रु. ३००१/- |
| उत्तेजनार्थ | रु. १५०१/- |

### राजगड राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन व विद्यापीठीय

*✻ वादविवाद स्पर्धा ✻*

## पारितोषिके

सांघिक फिरता करंडक

**(प्रथम क्रमांकाने विजयी झालेल्या संघास)**

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक पारितोषिक | रु. ७००१/- |
| द्वितीय क्रमांक पारितोषिक | रु. ५००१/- |
| तृतीय क्रमांक पारितोषिक | रु. ३००१/- |
| उत्तेजनार्थ | रु. १५०१/- |

## संयोजन समिती

१) प्रा.डॉ.एस.एन.साळुंखे, मो.९९६०६०३२१४
२) डॉ. जयश्री गोहाड, मो.९७६३३६३२६८
३) प्रा.एम.के.अहिरराव, मो.९८७५८५८५३९
४) प्रा.सौ.दिपाली जाधव, मो.९८२२८०१५५६
५) प्रा.डी.बी.भोसले, मो.९७६६५६६२३०

## मार्गदर्शक

***लोकनेते मा. श्री. अनंतरावजी थोपटे साहेब***
(माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य,
संस्थापक अध्यक्ष,राजगड ज्ञानपीठ,भोर)

***मा. श्री. संग्रामदादा थोपटे***
(आमदार-भोर,वेल्हा,मुळशी,
कार्याध्यक्ष,राजगड ज्ञानपीठ,भोर)

***मा. डॉ. सौ. भाग्यश्री पाटील***
(मानद सचिव,राजगड ज्ञानपीठ,भोर)





## पाच वर्षातील विजेते

### 'अनंत' वादविवाद

१) सन २०१५-२०१६, वर्ष २८ वे
नागेश गवळी
आनंदराव धोंडे महाविद्यालय,**कडा**
ता. आष्टी, जि. बीड

२) सन २०१६-२०१७, वर्ष २९ वे
निखिल नगरकर
एस. एस. जी. एफ. कॉलेज,**कोपरगाव**
जि. अहमदनगर

३) सन २०१७-२०१८, वर्ष ३0 वे
शेख अफसर यासीन
न्यु आर्टस,कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
**अहमदनगर**

४) सन २०१८-२०१९, वर्ष ३१ वे
भरत अर्जूनसिंग रॉडिलॉन
जे.पी.एन.कॉलेज,**औरंगाबाद**

५) सन २०१९-२020, वर्ष ३२ वे
कु. हाके पल्लवी किरण
दयानंद वाणिज्य महाविद्यालय,**लातूर**

### 'निर्मल' वक्तृत्व

१) सन २०१५-२०१६, वर्ष २८ वे
शेख अफसर यासीन
आनंदराव धोंडे महाविद्यालय,**कडा**
ता.आष्टी,जि.बीड

२) सन २०१६-२०१७, वर्ष २९ वे
हौसेराव हुबाले
देशभक्त आनंदराव नाईक कॉलेज,**चिखली-शिराळा**

३) सन २०१७-२०१८, वर्ष ३0 वे
धुमाळ सुस्मीता (विभागुन)
भालेराव लॉ कॉलेज,**सातारा**
झा अशुतोष शंभुनाथ
इंदिरा कॉलेज,**वाकड**

४) सन २०१८-२०१९, वर्ष ३१ वे
सतिश कांबळे
जे.पी.एन.कॉलेज,**औरंगाबाद**

५) सन २०१९-२020, वर्ष ३२ वे
बहिरके पराग
एस. पी. कॉलेज, **पुणे**

## संयोजक

| प्रा. कल्याण चव्हाण | प्रा.सौ.ए.एस.खैरमोडे | डॉ. प्रसन्न देशमुख |
|---|---|---|
| संयोजक समिती प्रमुख | समन्वयक समिती प्रमुख | प्राचार्य |
| मो. ९७६७९६0७३९ | मो. ९३२0३0५0७७ | |

राजगड ज्ञानपीठाचे

# अनंतराव थोपटे महाविद्यालय

भोर, जि. पुणे-४१२२०६.
नॅक मुल्यांकित 'अ' श्रेणी प्राप्त

पुणे विद्यापीठाचा
"सर्वोत्कृष्ट महाविद्यालय"
पुरस्कार प्राप्त महाविद्यालय

राजगड राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन व विद्यापीठीय

# 'अनंत' वादविवाद
# 'निर्मल' वक्तृत्व
# स्पर्धा



सन २0२0 - २0२१

**वर्ष ३३ वे**

*दिनांक : ५ मार्च २०२१*
*दिनांक : ६ मार्च २०२१*

राजगड ज्ञानपीठाचे, अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर द्वारा आयोजित

# राजगड राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन व विद्यापीठीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा सन २०२०-२०२१ (वर्ष ३३ वे)

## लोकनेते मा. श्री. अनंतरावजी थोपटे (संस्थापक अध्यक्ष-राजगड ज्ञानपीठ, भोर)

### स्पर्धा दिनांक

दिनांक ५/३/२०२१ व दिनांक ६/३/२०२१

### स्पर्धेचे उद्घाटन

दिनांक ५/३/२०२१

### वेळ

सकाळी १०.०० वाजता

### पारितोषिक वितरण समारंभ

दिनांक ६/३/२०२१

### स्पर्धा स्थळ

अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर (पुणे) ४१२ २०६
फोन-(०२११३) २२२७१०, २२२७४६, फॅक्स- २२२७१०
Email : atc.bhor@gmail.com
Mobile- 9767960739

### वादविवाद स्पर्धेसाठी प्रस्ताव

**कोरोनासारख्या विश्वव्यापी साथीच्या रोगांना आव्हान देण्यास भारत सक्षम आहे**

### वक्तृत्व स्पर्धेसाठी विषय

१) छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषीविषयक धोरण
२) भारतीय अर्थव्यवस्थेवर लॉकडाऊनचा परिणाम
३) कोरोनाचा शिक्षणव्यवस्थेवरील परिणाम
४) ग्रामप्रशासन : महिलांचा सहभाग

### स्पर्धेचे नियम व अटी

१) महाराष्ट्रातील कोणत्याही विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील/ विद्यापीठातील कोणत्याही विद्याशाखेत पदवी / पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनीस या स्पर्धेमध्ये भाग घेता येईल. वयोमर्यादा-२५ वर्षे

२) या स्पर्धेतील सर्व भाषणे मराठीतच होतील.

३) स्पर्धेसाठी भरावयाच्या प्रवेश अर्जात स्पर्धक विद्यार्थ्यांचे संपूर्ण नाव अभ्यासवर्ग विद्याशाखा इतर आवश्यक माहीती दिली पाहिजे.

४) स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांचे अर्ज त्यांच्या महाविद्यालयांच्या प्राचार्यां मार्फतच आले पाहिजेत.

५) स्पर्धकास फक्त नऊ (७+२) मिनीटे वेळ देण्यात येईल, आवश्यकता वाटल्यास हा अवधी जास्त कमी करण्याचा अधिकार संयोजकांना राहील व तो स्पर्धकांवर बंधनकारक राहील.

६) काही अपरिहार्यकारणामुळे स्पर्धेच्या तारखेत किंवा ठिकाणात बदल झाल्यास तसे संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांना योग्य वेळी कळविण्यात येईल. वैयक्तिकपणे स्पर्धकास कळविले जाणार नाही. या संबंधीची चौकशी स्पर्धकांनी आपल्या महाविद्यालयाच्या कार्यालयातच करावी.

७) स्पर्धा सुरु होण्यापूर्वी स्पर्धकांना अनुक्रम कार्ड दिले जाईल, त्यानुसार अनुक्रमांकाच्या चिठ्ठ्या एकत्रित करुन ऐनवेळी सूत्रसंचालक जी चिठ्ठी उचलतील त्या क्रमांकाच्या स्पर्धाकास बोलावे लागेल. त्याला आपले क्रमांक कार्ड सुत्रसंचालकाकडे परत करावे लागेल.

८) या स्पर्धेतील भाषणे पारितोषिके देण्यास योग्य नाहीत असे परीक्षकांचे मत पडल्यास ती देण्याचे रहीत करण्याचा अधिकार संयोजकांना आहे. परिक्षक मंडळाचा निर्णय अखेरचा समजला जाईल व तो बंधनकारक राहील.

९) स्पर्धेच्या शेवटी, पारितोषिक वितरण समारंभ होईल.

१०) सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्रके देण्यात येईल.

११) प्रत्येक स्पर्धकाने आपल्या महाविद्यालयाचे ओळखपत्र (आयडेंटी कार्ड) व मा.प्राचार्यांचे शिफारस पत्र सोबत आणलेच पाहीजे व ते स्पर्धा चालकांना सादर करावे.

१२) स्पर्धकांची निवास व्यवस्था आमचे महाविद्यालय विनामूल्य करेल. सोबत पुरेसे बेडींग आणावे. मात्र स्पर्धकाने तशी पुर्व सूचना देणे आवश्यक आहे, प्रवास व भोजनाचा खर्च ज्याचा त्याने करावयाचा आहे.

१३) स्पर्धेत विजयी होणाऱ्या स्पर्धकांना देण्यात येणारा 'अनंत' करंडक व 'निर्मल' करंडक विजेत्या विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयाकडे वर्षभर राहील. मात्र पुढील वर्षाच्या स्पर्धेपुर्वी हा करंडक मा.प्राचार्य-अनंतराव थोपटे महाविद्यालय भोर यांच्याकडे सुस्थितीत स्वखर्चाने परत करावा लागेल त्यासाठी लेखी हमी यशस्वी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना द्यावी लागेल.

१४) नाव नोंदणीसाठी लिंक:
https://www.atcbhor.com/debate

### वक्तृत्व स्पर्धा

- प्रत्येक महाविद्यालयाने वक्तृत्व स्पर्धेसाठी जास्तीत जास्त दोन स्पर्धक पाठवावेत.
  स्पर्धकाने आपला विषय प्रवेश अर्जात नमूद करावा, ऐनवेळी तो बदलता येणार नाही.
- प्रवेश शुल्क रु. १००/- वक्तृत्व स्पर्धेसाठी.

### वादविवाद स्पर्धा

- प्रत्येक महाविद्यालयास दोन विद्यार्थ्यांचा एक संघ पाठविता येईल. पैकी एका स्पर्धकास विषयाच्या अनुकूल बाजूने बोलावे लागेल व दुसऱ्या स्पर्धकास विषयाच्या प्रतिकूल बाजूने बोलावे लागेल. एकदा नमूद केलेली बाजू बदलून मिळणार नाही. केवळ एकाच स्पर्धकास सदर स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही. तसे झाल्यास तो स्पर्धक व संघ पारितोषिकासाठी अपात्र ठरविला जाईल.
- प्रवेश शुल्क रु. २००/- वादविवाद स्पर्धेसाठी. (प्रत्येक संघासाठी)
- टीप : भोर कडे येणाऱ्या एस.टी.सेवा : जळगांव, औरंगाबाद, शिरुर, महाड, खेड, श्रीवर्धन, दापोली, रत्नागीरी, नाशिक, संगमनेर, जुन्नर, भीमाशंकर, बारामती, फलटण, लोणंद, नीरा, शिर्डी, राहुरी, लोणी, कोल्हापूर, सांगली, सातारा, कऱ्हाड, शिरवळ, पंढरपुर, नातेपुते, अकलुज, परेल, वाशी, मुंबई, लोणावळा, सासवड, रोहा, अक्कलकोट इ.
- स्वारगेट बसस्टॅन्ड पुणे येथुन भोर साठी प्रत्येकी १५ मिनीटाला एस. टी. सेवा आहे. सकाळी ६.०० ते रात्रौ ११.०० पर्यंत.
- खान्देश, मराठवाडा व विदर्भातील एस.टी. शिवाजीनगर बसस्टॅन्ड येथे येतात.
- कोल्हापूर विभागातील एस.टी. शिरवळ बसस्थानकावर थांबतात. शिरवळ-भोर अंतर १२ कि.मी. आहे. शिरवळ येथून भोर साठी प्रत्येकी ३० मिनीटाला भोर-शिरवळ-भोर एस.टी.सेवा आहे. सकाळी ६.३० ते रात्रौ ८.३० पर्यंत.
- स्पर्धक विद्यार्थ्यांची चहा, अल्पोपहार व भोजनाची सोय महाविद्यालयाकडून केली जाईल.